दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र


नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

u RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : ३३७ वा | मंगळवार दि. ३ ऑक्टोबर २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## नांदेडच्या शासकीय रुग्णालयात मृत्यूचे तांडव



**नांदेड ।** राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये नेमकं कामकाज कसं चालतं? असा प्रश्न निर्माण व्हावा, अशा घटना सातत्याने समोर येत आहेत. शासकीय रुग्णालयांमध्ये होणाऱ्या मृत्यूच्या घटना वाढताना दिसत आहेत. नांदेडमध्ये तर अतिशय धक्कादायक घटना घडलीय. नांदेडच्या शासकीय रुग्णालयातील धक्कादायक प्रकार समोर आलाय. शासकीय रुग्णालयात २४ तासात तब्बल २४ रुग्णांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

### न्यूज कॉलम

#### कत्तलीसाठी जाणाऱ्या सहा बैलांना जीवदान

**धुळे ।** एका पिक-अप वाहनातून निर्दयपणे कत्तलीसाठी होणारी बैलांची वाहतूक नरडाणा पोलिसांनी रोखली. वाहनातील सहा बैलांची यातून पोलिसांनी सुटका केली. या प्रकरणी वाहनचालकावर गुन्हा दाखल केला. पोलिसांनी गव्हाणे (ता. शिंदखेडा) शिवारात पिक-अप (एमएच १८, बीजी ८१८३) पकडले. चालक पसार झाला. वाहनाच्या तपासणीत खिल्लारी जातीचे सहा बैल क्रूरतेने बांधलेले आढळले. एकूण ६४ हजारांचे बैल व ४५ हजार रुपये किमतीचे वाहन असा एकूण एक लाख नऊ हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

#### संशयितरीत्या फिरणाऱ्या तिघांविरुद्ध गुन्हा

**धुळे ।** शहरातील मोहाडी उपनगर परिसरातील अरिहंतनगर येथे लोखंडी पत्र्यांसह संशयितरीत्या फिरणाऱ्या तिघांना पोलिसांनी पकडले. याबाबत संदीप पाटील यांच्या फिर्यादीवरून संशयित तेजस गजानन जगताप (रा. प्लॉट क्रमांक १८, प्रेरणा स्टिक होम कॉलनी, एमआयडीसी, जळगाव व ह.मु. देशमुखवाडा, मोगलाई, धुळे), विक्की रवींद्र सूर्यवंशी व तौहिद हासीमअली सय्यद (रा. वडजाई) यांच्याविरुद्ध मोहाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

# बालक अन् युवतीच्या मृत्यूमुळे आदिवासी समाज साक्रीमध्ये संतप्त

### वसतीगृह गृहपालांचे निलंबन

**साक्री । प्रतिनिधी**

गेल्या दोन दिवसांत तालुक्यातील आदिवासी विद्यार्थी आणि विद्यार्थीनीचा आकस्मित मृत्यू झाल्याने आदिवासी समाज संतप्त झाला आहे. आश्रमशाळेत शिकणारा पाचवीचा विद्यार्थी व वसतीगृहात राहणार्या युवतीने गळफास घेऊन आत्महत्या केली. मात्र, वसतीगृह अधिक्षकांच्या हलगर्जीपणामुळेच आदिवासी विद्यार्थ्यांचा बळी जात असून दोषी अधिक्षकांवर निलंबनाची कारवाई झाल्याशिवाय मृतदेह ताब्यात न घेण्याचा पवित्रा आदिवासी समाजाने घेतला. कालपासून आदिवासी समाज आपल्या मागणीवर ठाम होता. अखेरीस प्रकल्प अधिकार्यांनी वसतीगृहाच्या गृहपालांना तडकाफडकी निलंबित केले. त्यानंतर नातलगांनी मृतदेह ताब्यात घेतले. दरम्यान, नातेवाईकांनी साक्री रुग्णालयात गर्दी केल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

साक्री तालुक्यातील आमळी येथील अनुदानित आश्रमशाळेत अनिल कोमश्या पाडवी (११) रा.धडगाव हा इयत्ता पाचवीत शिकत होता. दि.३० रोजी तो शाळेच्या बाथरुममध्ये गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला.त्यानंतर काल सायंकाळी साक्रीतील शासकीय आदिवासी मुलींचे वसतिगृहात राहणारी इयत्ता बारावीची विद्यार्थीनी रंजना रोडू चौरे (१८) ही जांभोरा परिसरात झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आली. या दोन्ही घटना वसतीगृह अधीक्षकांच्या हलगर्जीपणामुळेच झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला होता. शिवाय आदिवासी विद्यार्थ्यांचा संशयास्पद मृत्यू होत असल्याने आदिवासी समाजात संतापाचे वातावरण आहे. या दोन्ही विद्यार्थ्यांचे मृतदेह साक्री रुग्णालयात शवविच्छेदनासाठी काल दाखल करण्यात आले. तथापि, विद्यार्थीनीचा मृत्यू निजामपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत झाल्याने तिचा मृतदेह दाखल करुन घेण्यास रुग्णालयाने टाळाटाळ केली. त्यामुळे नातलगांसह आदिवासी समाजबांधवांनी संताप व्यक्त केला. त्यानंतर तिचाही मृतदेह शवविच्छेदनासाठी दाखल करुन घेण्यात आला होता. दोनच दिवसात आदिवासी विद्यार्थी व विद्यार्थीनीचा गळफासाने मृत्यू झाल्यामुळे आदिवासी संघटना आक्रमक झाल्या होत्या. या घटनेनंतर प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील यांनी काल सायंकाळी मुलींच्या आदिवासी वसतीगृहाला भेट दिली. यावेळी आदिवासी एकता परिषदेच्या वतीने त्यांना निवेदन देण्यात आले. आदिवासी विद्यार्थीनी रंजना चौरे हिचा मृत्यू वसतीगृहाच्या गृहपाल विमल जाधव यांच्या हलगर्जीपणामुळेच झाल्याचा आरोप केला. तसेच त्यांच्या निलंबनाची तसेच कर्मचार्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. शिवाय पाचवीचा विद्यार्थी अनिल पाडवी याच्या मृत्यूप्रकरणी मुख्याध्यापक, अधिक्षक, वर्गशिक्षक यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन निलंबित करण्यात यावे, अशी मागणी केली. यावेळी आदिवासी एकता परिषदेचे अध्यक्ष प्रेमचंद सोनवणे, उदय सूर्यवंशी, गणेश गावित, पुष्पा चौधरी, संजय ठाकरे, बापू सोनवणे, अजय राऊत, अविनाश अहिरे, नयन जैन, विनोद थोरात, किशोर साळुंखे, महेश घरटे, निलेश अहिरे उपस्थित होते.



**तडकाफडकी निलंबन**

**आदिवासी समाजबांधव आपल्या मागणीवर ठाम असल्यामुळे प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील यांनी आज सकाळी गृहपाल विमल शिवाजी जाधव यांच्या निलंबनाचे तडकाफडकी आदेश काढले. श्रीमती जाधव यांना निलंबन कालावधीत शासकीय मुलींचे वसतीगृह बोराडी. ता.साक्री येथील मुख्यालयात थांबण्याचे आदेश दिले आहेत. तसेच निलंबन कालावधीत त्यांना खाजगी नोकरी किंवा व्यवसाय करता येणार नाही, केल्यास कारवाईस पात्र ठरतील, असेही आदेशात म्हटले आहे.**



**आकस्मिक मृत्युची नोंद**

**आदिवासी विद्यार्थी आणि विद्यार्थिनीचा आकस्मिक मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान या घटने प्रकरणी पिंपळनेर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्युची नोंद झालेली आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणीही होत आहे. वसतीगृह अधीक्षकांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यु झाल्याचा आरोप करीत कारवाईची मागणी आदिवासी समाज बांधवांनी केली. त्या पार्श्वभूमीवर प्रकल्प अधिकाऱ्यांनी तडकाफडकी गृहपालांवर निलंबनाची कारवाई केली.**

# मैत्रेय ठेवीदारांचे गांधी पुतळ्यासमोर निदर्शन



**धुळे । प्रतिनिधी**

मैत्रेय ठेवीदारांच्या परताव्यासह विविध प्रश्नांबाबत शासनाला कोणतेही गांभीर्य दिसून येत नसल्यामुळे त्याच्या निषेधार्त मैत्रेय ठेवीदार आणि प्रतिनिधींनी रस्त्यावर उतरत रोष व्यक्त केला.

शहरातील महात्मा गांधी पुतळ्यासमोर जोरदार निदर्शने करीत लक्ष वेधण्यात आले. या आंदोलनात ठेविदार व प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मैत्रेय उपभोक्ता एवम अभिकर्ता असोसिएशनच्या नेतृत्वाखाली हे लाक्षणिक आंदोलन करण्यात आले. मैत्रेय गृप ऑफ कंपनी विरूध्द महाराष्ट्र शासन याच्यामार्फत मुंबई सेशन कोर्ट क्रं. ०७ मधील सुरू असलेले मैत्रेय प्रकरणावरील कामकाज अतिशय संथ गतीने सुरू आहे. या प्रकरणात गती मिळवून द्यावी. तसेच प्रॉपर्टी विक्रीचे आदेश न्यायालयाकडून तत्काळ प्राप्त करून घ्यावे. याबाबत सुचना करव्यात. मैत्रेय प्रकरणातील मुख्य आरोपी वर्षा मधुसूदन सत्पाळकर या तपासाच्या कामात सहकार्य करीत नसतील तर त्यांना अटक करावी. मैत्रेय गृप ऑफ कंपनीचे राज्यभरातील वास्तू विक्री करून त्यातून मिळणारे पैसे ऐस्क्रो खात्यात जमा करावे. ठेवीदारांच्या ठेवी लवकरात लवकर परत देण्याचा प्रयत्न करावा. उपमुख्यमंत्री (गृहविभाग)/गृहसचिव यांनी मैत्रेय प्रकरणाबाबत आपल्या दालनात संयुक्त बैठकीचे नियोजन करावे. या बैठकीलामैत्रेय असोसिएशनच्या पदाधिकारी व संबंधीत अधिकार्यांना बोलवावे. डिसेंबर २०२३ अखेरपर्यंत कामकाजाला योग्य ती गती मिळाली नाही आणि कामकाजात सुधारणा दिसून आली नाही तर मैत्रीय ठेवीदार आणि प्रतिनिधी शासन व प्रशासनाविरोधात जानेवारी २०२४ पासून जनआंदोलन छेडेल, असा इशाराही असोसिएशने प्रसिध्दी पत्रकातून दिला आहे.

# विसर्जन मिरवणुकीतील लेझर लाइटमुळे डोळे गमावण्याची वेळ

### नाशिकमधील सहा तरुणांचे डोळे भाजले; मुंबई, ठाणे, धुळ्यातही घटना

**नाशिक । प्रतिनिधी**



गणेशोत्सवात डीजेच्या दणदणाटामुळे काही जणांचा मृत्यू झाल्याचे समोर आले होते. मात्र, केवळ आवाजामुळेच नव्हे तर लेझर लाइटच्या झगमगाटामुळे तब्बल सहा जणांना आपली दृष्टी गमवावी लागल्याचेही समोर आले आहे. लेझरच्या लाइटमुळे डोळ्यांवरच थेट परिणाम होत असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.

गणेश विसर्जन मिरवणुकीत डीजे- लेझर लाइटमुळे सहा जणांवर कायमची दृष्टी गमावण्याची वेळ आली आहे. हे सहाही तरुण नाशिकचे आहेत. मात्र, धुळे, मुंबई आणि ठाण्यातही असे रुग्ण आढळल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. नाशिकमध्ये गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीत डीजे लावण्यास मनाई आहे. मात्र, यंदा आठ वर्षांनंतर नाशिकमध्ये डीजे लावण्यास परवानगी देण्यात आली होती. त्यामुळे या मिरवणुकीत डीजेच्या दणदणाटावर तरुण बेभान नाचले. या मिरवणुकांमध्ये लेझर लाईटचाही मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात आला होता. हे लेझर लाईट थेट डोळ्यांवर गेल्याने सहा तरुणांवर आपली दृष्टी गमवावी लागल्याचे समोर आले आहे. हे सर्व तरुण विशी-पंचवीशीतील असल्याचेही सांगण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, लेझर लाइटच्या थेट संपर्कात आल्याने आधी या मुलांना अंधूक दिसू लागले. त्यानंतर त्यांचे डोळे चुरचुरू लागले. डोळे चोळल्यामुळे त्यातून रक्तस्त्राव होऊ लागला. त्यामुळे त्यांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. यावेळी नेत्ररोग तज्ज्ञांनी त्यांना तपासले असता काहींच्या डोळ्यांमध्ये काळे डाग निर्माण झाल्याचे दिसले. तर, काही तरुणांच्या डोळ्यांवर भाजल्यासारख्या जखमा आढळून आले. अद्याप या तरुणांची नावे समजू शकली नाहीत. दरम्यान, डॉक्टरांनी या तरुणांना तपासल्यानंतर त्यांच्या डोळ्यांना अशा गंभीर इजा का झाल्या, हे डॉक्टरांनाही कळले नाही. काळा चष्मा न घालता वेल्डिंगचे काम जवळून पाहिल्यानंतर साधारण असे त्रास तरुणांना होतात. मात्र, जखमी तरुणांपैकी सर्वांनीच आपण वेल्डिंगचे काम पाहिले नसल्याचे सांगितले. नंतर या तरुणांनी गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीत लेझर लाइटचा त्रास झाल्याचे सांगितले. त्यानंतर हा प्रकार समोर आला आहे. या तरुणांना आता कायमस्वरुपी आपली डोळा गमवावा लागण्याची भीती आहे. त्यामुळे रात्रीच्या मिरवणुकांमध्ये लेझर लाइटचा वापर जपून करण्याचे आवाहन डॉक्टरांनी केले आहे.

# आदित्य ठाकरेंच्या छत्रपती शिवाजी महाराजांबद्दलच्या वक्तव्यामुळे निदर्शने



### रविवार कारंजावर निदर्शने, ठाकरेंच्या विरोधात घोषणाबाजी

**नाशिक । प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारने छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखे इंग्लंड येथून परत आणण्याच्या घोषणा केली. यावर माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी ही वाघनखे खरंच शिवाजी महाराजांची आहेत काय? तसा पुरावा काय? अशाप्रकारे बेताल प्रश्न विचारत तमाम शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या आहेत. असा आरोप करत भाजयुमोतर्फे आंदोलन, निदर्शने करण्यात आली.

या वक्तव्याचा निषेध करण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा नाशिक शहर यांनी रविवार कारंजा येथे निदर्शने केली. आदित्य ठाकरेंच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी यावेळी करण्यात आली. ही वाघनख खरंच शिवाजी महाराजांनी वापरली होती का? असा प्रश्न करून आदित्य ठाकरे यांनी समस्त शिवप्रेमींची भावना दुखावली आहे असा आरोप करत याचा निषेध म्हणून काल भारतीय जनता युवा मोर्चा नाशिक महानगर अध्यक्ष सागर शेलार यांच्या नेतृत्वाखाली जोडो मारो आंदोलन करण्यात आले.

यावेळी युवा मोर्चा शहराध्यक्ष सागर शेलार, प्रदेश सचिव अमित घुगे, प्रदेश क्रीडा विजय बनछोडे, निखिलेश गांगुर्डे, ऋषीकेश आहेर, प्रशांत वाघ, हर्षद जाधव, ड. पवन गुरव, विशाल पगार, अक्षय गांगुर्डे, विक्रांत गांगुर्डे, सचिन शेजवळ, विनोद येवले, कमलेश पिंगळे, रुपेश पाटील, नरेंद्र पाटील, विरेंद्र राठोड, सागर नागरे, राज चव्हाण आदींसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# महाराष्ट्र चेंबरच्या 'मायटेक्स्पो २०२३' प्रदर्शनाचा लाभ घ्यावा : ललीत गांधी

### प्रदर्शनास भेट देणाऱ्यांना ११ लाख रूपयांची बक्षीसे मिळणार

**नाशिक । प्रतिनिधी**



नाशिक येथील उत्पादनांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध व्हावी, या हेतूने महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, केंद्र आणि राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने 'मायटेक्स्पो २०२३' या आंतरराष्ट्रीय स्तराच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रदर्शनात वेगवेगळ्या कंपन्या तसेच केंद्र आणि राज्य सरकारच्या आस्थापनांचे ३०० हून अधिक स्टॉल्स राहणार आहेत. प्रदर्शनाद्वारे व्यापार, उद्योग, कृषी प्रक्रिया उद्योगांना व्यवसायवृद्धीची संधी उपलब्ध होणार असून अधिकाधिक नाशिककरांनी या चारदिवसीय प्रदर्शनाचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांनी केले.

महाराष्ट्रातील व्यापार तसेच विविध उद्योगांना चालना मिळावी, म्हणून महाराष्ट्र चेंबरतर्फे राज्याच्या विविध भागात मायटेक्स्पो प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. तर पहिल्या टप्प्यांत मुंबई येथे हे प्रदर्शन झाल्यानंतर दुस-या राज्यस्तरीय प्रदर्शनासाठी नाशिकची निवड करण्यात आली आहे. गंगापूर रोडवरील डोंगरे वसतीगृह मैदानावर दि. ६ ते ९ ऑक्टोबर दरम्यान या प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. त्याचे भूमिपूजन काल सकाळी ९.३० वाजता दिपक बिल्डर्सचे दिपक चंदे, खा. हेमंत गोडसे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले.

यावेळी चेंबरचे माजी अध्यक्ष संतोष मंडलेचा, वरीष्ठ उपाध्यक्ष अनिलकुमार लोढा, कांतीलाल चोपडा, नितीन बंग, शाखा चेअरमन संजय सोनवणे, समन्वयक सचिन शाह, सह समन्वयक मिलिंद राजपूत, व्हिनस वाणी, आयमाचे निखिल पांचाळ, धान्य व्यापारी संघटनेचे प्रफुल्ल संचेती, माजी उपाध्यक्ष सुधाकर देशमुख यांच्यासह उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी वरीष्ठ उपाध्यक्ष कांतीलाल चोपडा यांनीही माहिती दिली. चार दिवसीय प्रदर्शनातून काही कोटी रूपयांची उलाढाल होण्याचा अंदाज व्यक्त करून प्रदर्शनास भेट देणाऱ्यांना तब्बल ११ लाख रूपयांची बक्षीसेही देण्यात येणार असल्याचे अध्यक्ष ललित गांधी यांनी शेवटी सांगितले.

# 'आमचा गाव, आमचा विकास' : गावोगावी लोकसहभागातून कामांची लगबग

शहराप्रमाणेच खेड्यांचाही विकास सुनियोजित करण्यासाठी राज्य शासनाने 'आमचा गाव, आमचा विकास' ही योजना लागू केली. त्यामुळे ग्रामपंचायतींचे विकास आराखडे तयार करण्याची लगबग सुरू आहे. विकास आराखडा लोकसहभागीय पद्धतीने होणार असून त्याला गावच्या ग्रामसभेत मंजुरी घेण्यात येणार आहे.

केंद्र शासनाच्या पंचायती राज मंत्रालयाने २०२३-२४ मध्ये ग्रामपंचायत व पंचायत समिती विकास आराखडे मुदतीत व लोकसहभागातून तयार करण्यासाठी 'सर्वांची योजना, सर्वांचा विकास' ही मोहीम राबविण्यात येत आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीने निवडलेल्या संकल्पनांच्या आधारे 'थिमॅटिक' ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्यात येत आहे. गरिबीमुक्त गाव, निरोगी गाव, बालस्नेही गाव, पाणीदार गाव, स्वच्छ आणि हरित गाव स्वयंपूर्ण पायाभूत सुविधा असलेले गाव, सामाजिकदृष्ट्या सुरक्षित आणि सामाजिकदृष्ट्या न्याय्य गाव, सुशासन असलेले गाव, महिला अनुकूल गाव ही शाश्वत विकासाची ध्येये आपल्या गावात आरसा आहेत. पुढील विकासाचे दिशादर्शन आहे. गावातील नागरिकांच्या बालकांपासून वृद्धापर्यंतच्या गरजांची परिपूर्ती करण्याची संधी ग्रामपंचायतींना ग्रामविकास आराखड्यामधून करता येणार आहे. नऊ शाश्वत विकास ध्येयांचा आराखडा करताना ग्रामपंचायतींना नियोजनासाठी प्राधान्यक्रम ठरविता येणार आहे. आराखड्याच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील प्रत्येक पंचायत समितीतर्फे गावाचे सरपंच व ग्रामसेवकांना पंचायत समितीस्तरावर व अंगणवाडी सेविकांना ग्रामस्तरावर प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्यामुळे गावाचा विकास आराखडा परिपूर्ण पद्धतीने तयार होऊन त्यानुसार गावातील कामे होणार आहेत. ग्रामपंचायत विकास आराखडा अंतिम करण्यासाठी दोन ग्रामसभा घेणे बंधनकारक आहे. छाननी समितीने मान्य केलेल्या आराखड्यातील कोणतेही काम कमी करणे, वगळणे अथवा नवीन कामांचा समावेश करणे अथवा वाढविणे, कामांच्या मंजूर निधीमध्ये बदल करणे अशा प्रकारे कोणताही बदल ग्रामसेवक, केंद्रचालकांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय करता येणार नाही. विकास आराखडा लोकसहभागीय पद्धतीने होणार असून त्याला गावच्या ग्रामसभेत मंजुरी घेण्यात येणार आहे.




**मॉडेल स्कूल, आदर्श अंगणवाडीचा समावेश**

**आराखड्यात मॉडेल स्कूल, आदर्श अंगणवाडी, स्मार्ट प्राथमिक आरोग्यकेंद्राच्या अनुषंगाने आवश्यक असणाऱ्या कामांचा समावेश करावा. स्वच्छ भारत मिशन व नरेगांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांतर्गत करावयाची कामे व आराखड्यामध्ये समाविष्ट असणाऱ्या कामांचा समावेश करावा. आरोग्य, शिक्षण, महिला व बालकल्याण विभागाच्या कर्मचाऱ्यांना, ग्रामसभांना उपस्थित राहण्याच्या सूचना प्रशासनाने कराव्या.**

**असा होईल आराखडा मंजूर**

**ग्रामपंचायतींनी ग्रामसभेत ग्रामविकास आराखडा तयार करावा. तयार केल्यानंतर तो पंचायत समितीत पाठविण्यात येईल. पंचायत समितीतील तांत्रिक छाननी समिती आराखड्याला मंजुरी देऊन परत आराखडा ग्रामपंचायतीकडे पाठवेल. ग्रामपंचायत ग्रामसभा बोलावून दुसऱ्या ग्रामसभेत आराखड्याला मंजुरी देऊन अंतिम करेल. अंतिम आराखड्याला ग्रामसभेची मान्यता मिळाल्यानंतर आराखडा पोर्टलवर संपादित करण्यात येईल.**

# प्रेमीयुगुलाची गळफास घेवून आत्महत्या

**धुळे । प्रतिनिधी**

तालुक्यातील पिंपळगाव खु. येथील प्रेमीयुगुलाने झाडाला गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना काल सायंकाळी उघडकीस आली. जांभोरे गावातील जंगलात ते दोघे झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळून आले. या घटनेने तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान, या दोघांचा कोणीतरी घातपात करुन त्यांना झाडाला लटकविल्याचा संशय नातलगांनी व्यक्त केला आहे.

येथील शासकीय आदिवासी मुलींचे वसतीगृहात राहणारी इयत्ता १२वी शिकणारी रंजना रोडू चौरे (१८) रा.पिंपळगाव खु. ही विद्यार्थीनी गेल्या तीनचार दिवसांपुर्वी शाळेत जाण्यासाठी निघाली होती. परंतु, ती परतलेली नव्हती. त्यामुळे वसतीगृहातून विद्यार्थीनीच्या वडिलांना फोन करण्यात आला. मात्र, ती घरी देखील आली नसल्याने वडिलांनी तिचा शोध सुरु केला. तिचा तपास सुरु असतानाच त्यांना जांभोरे गावाच्या पोलीस पाटलांमार्फत काल दुपारी २ वाजेच्या सुमारास त्यांना माहिती मिळाली की, पिंपळगाव गावातील मुलगा व मुलगीने जांभोरे गावातील जंगलात झाडाला गळफास घेतला आहे. त्यानंतर दोघांना खाली उतरवून साक्री ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे डॉ.गिरे यांनी त्यांना तपासून मृत घोषित केले.

## मग सरकार गावात न्या

आज पवित्र मंत्रोच्चारांमध्ये गणरायांना निरोप दिला जात असतानाच जिथे राज्यातील कोट्यवधी नागरिकांच्या हिताची 'मंत्रणा' व्हायला हवी; अशा मंत्रालयात सामान्य माणसाचा प्रवेश अधिक दुष्कर करण्यात आला आहे. त्यासाठीची तातडीने अमलात येणारी नियमावली राज्य सरकारने प्रकाशित केली आहे. या वास्तूला पूर्वी सचिवालय म्हणत. पण असे म्हणणे म्हणजे संसदीय लोकशाहीत सर्वोच्च स्थान असणाऱ्या लोकनियुक्त सरकारचे महत्त्व कमी लेखून नोकरशाहीला डोक्यावर चढविणे. म्हणून ते सचिवांचे नव्हे तर 'मंत्र्यांचे आलय' आहे, हे ठसविण्यासाठी 'सचिवालया'चे झाले मंत्रालय. मात्र, व्याकरणाच्या दृष्टीने तर हा शब्द चूक होता.

मंत्र्याचे ते मंत्र्यालय. मंत्रालय नव्हे. पण नाव तर ठरलेले. अशावेळी, सत्ताधाऱ्यांना उचित आणि शास्त्रसंमत प्रकाशवाटा दाखविण्यासाठी ज्यांचा लौकिक होता अशा महापंडित तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'मंत्रणा म्हणजे सल्लामसलत होते ते मंत्रालय', असा हा संधी सोडवून दिला. पेच सुटला. सगळे आनंदी झाले. आजही सत्ताधाऱ्यांवर ज्ञानप्रकाशाचे झोत टाकण्यासाठी अनेक पंडित उत्सुक आहेत! मात्र, तर्कतीर्थांचे ऐकणारे तेव्हा त्याच तोडीचे यशवंतराव होते. एव्हाना कुणाचेही काही न ऐकण्याची रीत बोकाळली आहे. पंडितांचे सोडा; नागरिकांचेही जास्त ऐकायचे नाही, अशा ठाम भूमिकेतून राज्य सरकारने नवी नियमावली जारी केली आहे. या नियमावलीत संरक्षणासाठी केलेल्या नियमांचे स्वागत करायला हवे. तसेच, मंत्रालयाच्या आवारात किंवा परिसरात खासगी वाहनांची गर्दी होऊ नये, हा आग्रह योग्यच आहे. मंत्रालयात हौशा, गवशा आणि नवशांचीही फार गर्दी झाली तर अपेक्षित मूळ आणि मुख्य काम कसे होणार, हा प्रश्नही योग्यच आहे. त्याला उत्तर शोधायलाच हवे.

असे असले तरी ही नियमावली करताना सरकारने यातील मूलभूत प्रश्नाला भिडायला हवे होते. अलीकडे मंत्रालयात किंवा परिसरात प्रश्न वेशीवर टांगण्यासाठी टोकाचे पाऊल उचलणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळेच, या इमारतीच्या पोटात भक्कम, लवचिक जाळी बसविली आहे. म्हणजे, कुणी उडी मारली तरी प्राण वाचतील. मात्र, तरीही तेथे उड्या मारणे चालूच आहे. जीव वाचले पण उडी घेणाऱ्यांना पकडण्यासाठी पोलिसांची जिवापाड धावपळ सुरू झाली. आंदोलकांचा प्रश्नाकडे महाराष्ट्राचे लक्ष वेधण्याचा जो हेतू होता, तो मात्र साध्य होतो. आता हेही अवघड होणार. पूर्वी मुंबईत अनेक मोर्चे निघत. त्यातले काही लाखालाखांचे असत. हे मोर्चे विधिमंडळाचे अधिवेशन चालू असे तेव्हा तिथे; किंवा एरवी थेट मंत्रालयावर जात. अनेकदा मंत्री, मुख्यमंत्री खाली उतरत. मोर्चेकरांशी बोलत. ही जनतेचा आदर करण्याची एक रीत होती. काही काळाने बहुतेक मोर्चे काळा घोडा इथे आणि नंतर तर आझाद मैदानातच अडवायला सुरुवात झाली. म्हणजे, सत्तेच्या मुख्य व्यासपीठासमोर दाद मागण्याचे समाधानही हिरावून घेण्यात आले. मंत्रालय प्रवेशाची नवी नियमावली म्हणजे या आधीच्या निर्बंधांचेच पुढचे पाऊल आहे. म्हणजे मोर्चाने येऊ नकाच; पण दाद मागायला एकेकटे याल तेव्हाही आधी प्रवेशपत्र घेऊन किंवा ऑनलाइन अर्ज करून या. सरकार ही बिनचेहऱ्याची यंत्रणा सामान्य, वंचित माणसाकडे कशी पाहते, याचे ही नियमावली हे द्योतक आहे.

यात एक अट तर मनोरंजकच आहे. मंत्रालयात एकाही अभ्यागताला यापुढे खिशात दहा हजारांपेक्षा जास्त रक्कम नेता येणार नाही. मंत्रालयात चालणाऱ्या व्यवहारांचा इतका बाळबोध अर्थविग्रह आजवर कुणी केला नसेल! जास्त रक्कम असेल, तर ती बाहेर सुरक्षित ठेवली जाईल. ती नंतर परत मिळेल. मंत्रालयात येणारी काही विशिष्ट माणसे आणि आतले काही चाणाक्ष यांची हुशारी, कल्पकता आणि लक्ष्मीच्या विविध अवतारांवरील त्यांची अतूट श्रद्धा यांचा इतका अपमान आजवर कधी झाला नसेल. मंत्रालयात आता बाहेरील खाद्यपदार्थ नेण्यासही बंदी आली आहे. एकेकाळी कराड-सातारा किंवा सांगलीहून येणारे भोळेभाबडे गावकरी यशवंतराव किंवा वसंतदादा यांच्यासाठी चटणीभाकर बांधून आणत, अशा दंतकथा आजही सांगितल्या जातात. आता आतल्याने काही दिले तरच खायला मिळणार. या साऱ्या नियमावलीतून एक गंभीर प्रश्न निर्माण होतो : तो म्हणजे राज्यभर ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, तहसीलदार कचेरी, जिल्हाधिकारी कार्यालय, विभागीय आयुक्तालय अशा सगळ्या उतरंडीवर नागरिकांची कामे का होत नाहीत? त्यांना मंत्रालयात यावेच का लागावे? मुख्यमंत्री आणि मंत्र्यांना राजामहाराजांसारखे दरबार का भरवावे लागतात? याला कार्यसंस्कृती म्हणत नाहीत. जिथे व्हायला हवीत, तिथे कामे होत नाहीत, म्हणून डोळ्यांत आशा पेलवत हजारो मराठी माणसे मंत्रालयाची वाट धरतात. त्यांना मुंबईत यावेच लागणार नाही, असे सरकार व नोकरशाहीने का वागू नये? 'शासन आपल्या दारी' हे प्रत्यक्षात आले तर नागरिकांना मंत्रालय पाहण्याची हौस नाही. पण हे होत नाही तोवर त्यांची अवस्था 'आई जेवू घालीना आणि बाप भीक मागू देईना..' अशी करू नका.

# वाढवण बंदर : काळाची गरज

वाढवण, पालघर जिल्हा डहाणू तालुक्यातील समुद्र किनाऱ्यालगत वसलेले एक लहान गाव असून हे ठाण्यापासून उत्तरेकडे ९० कि.मी. अंतरावर, तर राज्याची राजधानी मुंबईहून ११८ कि.मी. वर आहे. वाढवणच्या दक्षिणेस पालघर तालुका, उत्तरेकडे तलासरी तालुका, पूर्वेकडे विक्रमगड तालुका, उत्तरेस उंबरगाव तालुका आहे. कोकणातील इतर गावांप्रमाणे मासेमारी उद्योग येथील मुख्य उपजीविकेचे साधन असल्याने प्रस्तावित वाढवण बंदरामुळे किनाऱ्यालगत मासेमारी ठप्प होईल तसेच मौल्यवान जैविक विविधतेचा ऱ्हास होऊन एकंदरीत वाढवण आणि आसपासच्या भागातील जीवन उद्ध्वस्त होईल, या धास्तीने या बंदराच्या विकासासाठी विरोध होत आहे.

वाढवण बंदरामुळे कोळी बांधवांना भीती वाटणे साहजिक आहे. कारण सध्या विविध नैसर्गिक कारणाने समुद्रातील मत्स्य उत्पादनावर मर्यादा येत असून आपण बहुतेक समुद्रकिनारे मोठ्या प्रमाणांत प्रदूषित करत असल्याने समुद्रकिनारे भकास होत आहेत. परिणामी तेथील जैविकविविधता कमी होत आहे. असे असले तरी शासनस्तरावर आणि आपण सर्व, समुद्रकिनाऱ्याचे क्षेत्र प्रदूषणापासून मुक्त करण्याचे प्रयत्न करीत आहोत. प्रदूषणमुक्त समुद्र आपल्यासाठी गरजेचे आहे, हे सर्वांना पटल्याने शक्यतो समुद्री पर्यावरणाला धक्का न देता आज जगात विकास प्रकल्पाची उभारणी होत आहे. त्यामुळे वाढवण बंदराच्या उभारणीसाठी तेथील सागर क्षेत्राचे सौंदर्य, रक्षण करण्याचा आटोकाट प्रयत्न केला जाईल हे नक्की. अनादिकालापासून मानवाने आपली भौतिक प्रगती निसर्गाच्या जोरावरच केली, पण आपल्यामुळे निसर्ग कोपत आहे, हे कळल्यावर निसर्गाच्या संवर्धनासाठी आपण कटिबद्ध झालो आहोत. जग आज समुद्र वाचवण्यासाठी एकवटले आहे. जगात सर्व समुद्राचे वरदान लाभलेल्या देशात किनाऱ्यालगत मोठमोठी शहरे वसली असून औद्योगिक क्षेत्रही वाढले आहे.

आपल्या देशात समुद्रकिनाऱ्यालगत मुंबई, चेन्नई, कोलकाता महानगर आज केवळ समुद्रकिनारे लाभल्यामुळे जिवंत असून तेथील सागर किनारा क्षेत्रातील जैविकविविधता टिकून असून मत्स्य उत्पादनातही खंड नाही. मासेमारी करण्यास अडथळा, जैविकविविधतेचा ऱ्हास होईल म्हणून मुंबईत वरळी-वांद्रे समुद्र पुलाला विरोध झाला होता, पण हा समुद्र सेतू झाल्यापासून मोटार वाहतुकीसाठी खूप फायदा झाला. तसेच हवा प्रदूषण कमी होण्यास मदत झाली. समुद्रसेतू क्षेत्रातील जैविकविविधता टिकून मासेमारीस अडथळा झाल्याचे दिसत नाही. आता तर मुंबईच्या किनाऱ्यालगत समुद्र मार्ग होत



आहे,ज्यामुळे महानगरीतील मोटार वाहतूक जलद व सुरळीत होऊन हवा प्रदूषण कमी आणि इंधन बचत होईल. अशी किती तरी उदाहरणे आहेत ज्यात समुद्राच्या निकट किंवा किनाऱ्यालगत भर घालून सुविधा केल्या, ज्यामुळे आपल्या सोयीत भर पडून समुद्रातील साधनसंपत्ती टिकून आहे. समुद्री जीव बदलत्या परिस्थितीस जुळवून घेऊन धोका झाल्यास आपले निवासस्थान बदलतात. शिवाय समुद्रकिनाऱ्यालगतच्या क्षेत्रात झालेले जैविक बदल परत पहिल्याप्रमाणे होतात, एवढी शक्ती समुद्रात आहे. अशा सर्व परिस्थितीमुळे वाढवण बंदराच्या विस्तारामुळे मत्स्य उत्पादनात कमी होऊन जैविकविविधतेचा ऱ्हास होईल, असे मला वाटत नाही. भारताला ८०१४ किमी, त्यात महाराष्ट्राला ७२० कि.मी.च्या समुद्र किनाऱ्याचे वरदान लाभले आहे. पण मत्स्य उत्पादन आणि मर्यादित प्रमाणात सागर पर्यटन शिवाय आपले समुद्र किनारे दुर्लक्षित आहेत. आज सर्व समुद्र लाभलेल्या देशात ब्लू इकॉनॉमी म्हणजे मुख्यतः सागर क्षेत्राचा विकास करून, आर्थिक बळकटीसाठी समुद्राचे संरक्षण करून प्रयत्न होत आहेत. या प्रयत्नांचा एक भाग म्हणजे केंद्र सरकारने सुरू केलेली सागरमाला योजना. भारताची आर्थिक आकांक्षा साकार करण्यासाठी सागरमाला प्रकल्पातंर्गत किनाऱ्यालगतच्या समुद्र क्षेत्राचे संरक्षण करणे, मत्स्य उत्पादन वाढवून मत्स्य विक्री, साठवण, मत्स्य प्रक्रिया उद्योगासाठी अद्ययावत सुविधा निर्माण करणे, कोळी बांधवांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी योजना राबवणे आणि बंदर नेतृत्वात असलेल्या विकासाचे मॉडेल विकसित करणे ही उद्दिष्ट्ये आहेत.

यामुळे भारतीय बंदरे आणि एकदंरीत आपले सागर क्षेत्र देशाच्या जीडीपीमध्ये मोठे योगदान देतील. सागरमाला प्रकल्पातंर्गत अस्तित्वात असलेल्या बंदरांना आधुनिक जागतिक दर्जाच्या बंदरांमध्ये रूपांतरित करण्याची आणि नवीन उच्च दर्जाच्या पोर्टमध्ये विकसित करण्याची योजना आहे. यामुळे रस्ते, रेल्वे, अंतर्देशीय आणि किनारपट्टीच्या जलमार्गांद्वारे औद्योगिक क्षेत्र समूह, निर्गमन प्रणालींसह बंदरे कार्यक्षमतेने समकालिक होतील, ज्यामुळे किनारपट्टीच्या भागात आर्थिक हालचालींना चालना मिळेल. सागरमाला योजने अंतर्गत समुद्री मार्ग आणि मोठ्या नद्यांद्वारे माल वाहतुकीच्या वाहतुकीचे प्रमुख साधन विकसित केल्यामुळे आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत दोन्ही क्षेत्रांसाठी कार्गोची कार्यक्षम आणि अखंड सेवा मिळेल आणि त्याद्वारे बंदरे मोठ्या अर्थव्यवस्थेसह वाहतूक खर्च कमी करतील.

दीनदयाल, मुंबई, जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी), मोरमुगाव, न्यू मँगलोर, कोचीन, चेन्नई, कामराझर, व्ही. चिदंबरनार, विशाखापट्टणम, पारादीप आणि कोलकाता (हळदियासह) सध्या १२ प्रमुख बंदरे भारताच्या किनारपट्टीवर आहेत. महाराष्ट्रात मुंबई आणि जेएनपीटी ही दोन मोठी बंदरे आहेत. जे एनसीआर, पंजाब, राजस्थान आणि उत्तर प्रदेशसह महाराष्ट्राच्या सीमावर्ती समुद्रमार्गे भागात होणारी आयात-निर्यातीच्या मालाची पूर्तता करतात. या बंदरांपैकी, मुंबई बंदराला कमी खोली तसेच शहराच्या अतोनात विकासामुळे गेल्या अनेक दशकांपासून मालवाहतुकीची चढ-उतार करण्यास मर्यादा येत आहेत. मुळात जेएनपीटी हा मुंबई बंदराचा उप बंदर म्हणून विकसित करण्यात आला होता आणि देशातील सर्वात मोठे कंटेनर पोर्ट म्हणून नाव मिळवले आहे. जेएनपीटीच्या चौथ्या कंटेनर टर्मिनलच्या विकासानंतर तेथे पुढील विस्तारासाठी फारच कमी जागा आहे. त्याशिवाय तेथे खडकाळ तळाचा अभाव असल्यामुळे तो जास्त खोल करण्यास मर्यादा असल्याने भविष्य काळातील मेगा जहाजाची वाहतूक जेएनपीटीतून होऊ शकणार नाही. म्हणून सागरमाला योजनेअंतर्गत वाढवण बंदराचा विकास करण्याचे ठरवले आहे.

भारतात २० मीटर खोली असलेल्या बंदराचा अभाव असल्याने मालवाहू जहाजांना प्रथम कोलंबो (१५ मीटर खोल) किंवा सिंगापूर (१२ मीटर) या बंदरावर माल उतरावा लागतो. जो नंतर लहान मालवाहू जहाजातून जेएनपीटी (११ मीटर खोली)सारख्या भारतीय बंदरांवर येतो. आपला आयात-निर्यातीचा ९०% माल समुद्रमार्गे जात असल्याने आयातदार व निर्यातदारांना मोठी गैरसोय सहन करावी लागते. यासाठी भारताला पश्चिम किनाऱ्यावर २० मीटर खोलीचे बंदर झाल्यास मालवाहतूक वाढेल. कंटेनर जहाजांचा वाढता आकार असल्यामुळे भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर खोल कंटेनर पोर्ट विकसित होणेही अत्यावश्यक आहे. वाढवण किनाऱ्याजवळ जवळपास २० मीटरची नैसर्गिक खोली आहे, ज्यामुळे बंदरावर मोठ्या जहाजांना हाताळणे शक्य होईल. या बंदराच्या विकासामुळे १६०००-२५००० टीईयू क्षमतेच्या कंटेनर जहाजांची वाहतुकीसाठी कॉलिंग सक्षम झाल्याने मोठ्या प्रमाणात अर्थव्यवस्थेचा फायदा होऊन इतर खर्च कमी होईल.

वाढवण बंदरासाठी लागणारी सर्व ३००० हेक्टर जमीन आधीपासूनच सरकारची आहे. हे बंदर आगामी दिल्ली-मुंबई फ्रेट कॉरिडोरपासून फक्त १२ किलोमीटर अंतरावर आहे. दिल्ली-मुंबई राष्ट्रीय महामार्गापासून (एनएच -८) ३४ किलोमीटर आणि मुंबई बडोदा एक्स्प्रेस हायवेपासून २२ किलोमीटर अंतरावर आहे. हे बंदर गुजरातमधील वापी औद्योगिक क्षेत्रातील मध्य प्रदेशातील इंदौर औद्योगिक क्षेत्र आणि उत्तर कर्नाटक ते महाराष्ट्र क्षेत्रातील सर्व औद्योगिक कंपन्यांच्या निर्यात-आयातच्या गरजा सुलभ करेल. भारताच्या पश्चिम किनारपट्टीमध्ये सध्या दरवर्षी १ दशलक्ष टीईयू हाताळण्याची क्षमता असून जी जेएनपीटी आणि मुंद्रा बंदरे बहुतेक हाताळत आहेत. जेएनपीटीसह सर्व बंदरांची सध्याची वाहतूक क्षमता उच्च मर्यादेच्या पातळीवर पोहोचली आहे. मूल्यवर्धित उत्पादन क्षेत्राच्या पार्श्वभूमीवर कार्गोचे वाढते कंटेनिकरण, उत्पादन क्रियाकलाप सुलभ करण्यासाठी, किंमती आयात आणि निर्यात हाताळण्यासाठी आपली बंदर पायाभूत सुविधा सुधारणे महत्वाचे आहे. वाढवण बंदराच्या विकासामुळे भारत जगातील पहिल्या दहा कंटेनर बंदर असलेल्या देशांमध्ये प्रवेश करेल.

वाढवण बंदर लँड लॉर्ड मॉडेल च्या धर्तीवर विकसित होणार असून प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी जेएनपीटी सह ५०% किंवा त्याहून अधिक इक्विटी भागीदारीसह प्रमुख भागीदार म्हणून 'स्पेशल पर्पज व्हेईकल'ची स्थापना केली आहे. एसपीव्ही बंदरासाठी पायाभूत सुविधा विकसित करणार असून यामध्ये रिक्लेमेशन अर्थात भराव टाकून जमीन प्राप्त करणे, ब्रेक वॉटरचे बांधकाम तसेच किनाऱ्याच्या मागील भागात संपर्क सुविधा उभारणे इत्यादींचा समावेश असेल. खाजगी विकासकांकडून सार्वजनिक-खासगी भागीदारीतून व्यवसाय संबंधित सर्व कामे केली जातील. प्रस्तावित बंदर तारापूर औद्योगिक क्षेत्रासाठी कार्गो च्या आयात आणि निर्यातीसाठी प्रवेशद्वार बंदर म्हणून वापरले जाऊ शकते. बंदरात हाताळल्या जाणाऱ्या मालवाहक मालात पोलादांच्या रॉड, स्टील कॉइल, भंगार इत्यादी आहेत. याव्यतिरिक्त, राज्यातील वीज मागणी पूर्ण करण्यासाठी, वाढवण बंदरातून २.५ गीगावॅटच्या तटवर्ती उर्जा संकुलासाठी कोळसा हाताळेल. वाढवण बंदराच्या प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर, सर्वांना फायदा होईल. सदर प्रकल्पातून स्थानिकांना रोजगार निर्मिती, रस्ता व रेल्वे जोडणीचा विकास, वेअर-हाऊसिंगमुळे व्यापार संधी, मालवाहू हाताळणी आणि इतर वाहतुकीच्या सोयीत भर पडेल.

**- डॉ. बाळासाहेब गो. कुलकर्णी,**
**संचालक (निवृत्त) इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स**

# विद्युतवाहनांची धोरणे व सद्यस्थिती

काही दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत पीएमई बस सेवा योजनेवर शिक्कामोर्तब करण्यात आले. सार्वजनिक वाहतूक सेवेच्या विस्तारांतर्गत हे मोठे पाऊल उचलण्यात आले आहे. याचा फायदा देशातील सर्वसाधारण जनतेला मोठ्या प्रमाणावर होणार आहे. या योजने अंतर्गत १०० शहरांची निवड करण्यात आली असून सार्वजनिक-खासगी तत्त्वावर तब्बल दहा हजार नव्या बस गाड्या रस्त्यांवर धावणार आहेत. या योजनेसाठी एकूण ५७ हजार ६१२ कोटी रुपये लागणार असून केंद्र सरकार २० हजार कोटी रुपये उपलब्ध करून देणार आहे, तर उर्वरित निधी राज्य सरकारला उभा करावा लागणार आहे. पुढील दहा वर्षे ही योजना कार्यरत राहणार आहे, असे नियोजन आहे.

सर्व मोठ्या शहरात डिझेल व पेट्रोल वाहनांद्वारे होणारे प्रदूषण टाळावे व डिझेल व पेट्रोलवरील आपल्या देशाचे परावलंबत्व कमी करावे, यासाठी केंद्र सरकारने गेल्या काही वर्षांत विद्युत वाहनांच्या खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात चालना दिली. मोठ्या प्रमाणात सवलती दिल्या आहेत. आजच्या परिस्थितीत देशात मोठ्या प्रमाणात विद्युत वाहने रस्त्यावर धावतांना दिसत आहेत. खासगी तसेच सार्वजनिक वाहतुकीत बरीच वाहने आता विद्युतवर चालणारी आहेत. मुंबईतील बेस्टकडेही हजारोंच्या आसपास बस गाड्या आता विद्युतवर चालणाऱ्या बस आहेत. बाजूच्या नवी मुंबई, ठाणे, मीरा-भाईंदर, पुण्यासारख्या शहरातही रस्त्यांवरसुद्धा विद्युत बस धावताना दिसत आहेत, ही एक मोठी सुखावह बाब असली तरी त्या आनुषंगाने विद्युत वाहनांचे फायदे व तोटे या सर्वच अंगाने विचार करणे आपल्याला क्रमप्राप्त आहे.

जगभरातील अनेक देशांनी पेट्रोल किंवा डिझेलवर चालणाऱ्या गाड्यांची जागा विद्युत वाहनांनी भरून काढली आहे. इंधन जाळल्यामुळे होणारा उत्सर्ग व वाहनांच्या इंजिनचे ध्वनिप्रदूषण यास पर्याय म्हणून विद्युत वाहने सध्या खूप आकर्षक व स्वस्त वाटत आहेत. भारताची परिस्थिती बघता असे दिसते की, येत्या २०३० पर्यंत देशातील ३० टक्के खासगी वाहने विद्युत वाहने असणार आहेत. तसेच प्रत्येक घराच्या समोर असलेली दुचाकी व तीन चाकी वाहनेही विद्युत वाहने असतील. याच दरम्यान ७० टक्के अवजड वाहने विद्युत वाहने झालेली आढळतील. म्हणजे संपूर्ण देशात पाच कोटींच्या आसपास विजेवर धावणारी वाहने असतील, असा अंदाज आहे. सध्या भारतात इलेक्ट्रिक वाहन निर्मिती करणाऱ्या डझनभर कंपन्या अस्तित्वात आहेत. मात्र या कंपन्यांनीसुद्धा आतापर्यंत आठ लाखांपेक्षा जास्त वाहने निर्माण केली आहेत. तर आज रस्त्यांवर २८ लाख वाहने विद्युत प्रणालीवर धावत आहेत. गेल्या काही वर्षांत केंद्र सरकारने विद्युत वाहनांना व उत्पादकांना सवलती दिल्यामुळे विद्युत वाहनांची विक्री वाढली आहे. केंद्र सरकारने आपल्या योजनेखाली आतापर्यंत ६ हजार ५०० कोटी रुपये या वाहनांसाठी सबसिडी म्हणून दिली आहे व सार्वजनिक परिवहन सेवांकरिता बस गाड्यांसाठी 'फेम' योजनेखाली मोठी सबसिडी दिली आहे. मात्र या सबसिडीचा जबरदस्त फायदा वाहन उत्पादकांनी घेतला, तर त्याचा फारच कमी फायदा हा सर्वसामान्य ग्राहकांना झाला आहे.


फेम योजनेंतर्गत सार्वजनिक वाहतुकीसाठी, बस खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात हा निधी देण्यात येतो, मात्र हा निधी परिवहन संस्था ही सवलत स्वतः न वापरता भाडोत्री कंत्राटदारांकडून बस घेतात व ही सवलत कंत्राटदाराच्या खिशात हा निधी घालतात, यावर एक मोठे संशोधन होईल. त्यामुळे या सर्व गोष्टींकडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून बघण्याची वेळ आता आली आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये विद्युत वाहनांच्या ग्राहकांची मागणी जरी वाढताना दिसत असली तरी आजही ग्राहकांचा लोंढा हा पेट्रोल व डिझेल याकडेच जास्त वळलेला दिसेल. आजही विद्युत वाहनांसमोर केवळ इतर आव्हाने नाही तर तंत्रज्ञान सुरक्षितता हेही मोठे आव्हान आहे. या तंत्रज्ञानात अजूनही खूप मोठ्या अडचणी आहेत. आज विद्युत वाहनांची किंमत ही सर्वसाधारण वाहनांपेक्षा जरा जास्तच आहे. आजही आपल्या इथला मोठा ग्राहक वर्ग हा विद्युत वाहनांकडे वळलेला दिसत नाही. विद्युत वाहनेही शहरात जास्त प्रमाणात पसंत केली जातात. कारण ग्रामीण भागात अजूनही विद्युत चार्जिंग सेंटरची कमतरता आहे. गाडी बंद पडल्यावर मेकॅनिकही त्वरित मिळत नाही. त्यामुळे गाडी टोईंग करून घेऊन जाणे हाच पर्याय विद्युत वाहनचालकांसमोर असतो. या वाहनांच्या पायाभूत सुविधाही आपल्याकडे पाहिजे त्या प्रमाणात उपलब्ध नाहीत. प्रत्येक गाडीची बॅटरी पूर्ण चार्ज करण्यासाठी किमान काही तासांचा अवधी लागतो. आज मुंबईतील बेस्ट उपक्रमास शहरात बससेवा चालवण्यासाठी विद्युत बसगाड्यांच्या बाबतीत बऱ्याच अडचणी येत आहेत. सध्या एसटी महामंडळाकडेही ई-शिवनेरी बसेस आहेत. मात्र त्याही प्रमुख बस मार्गांवर धावतात. गावोगावी जात नाहीत, याही मर्यादा लक्षात घेतल्या पाहिजेत.

**क्रमशः**

**- मुंबई डॉट कॉम : अल्पेश म्हात्रे**

## शब्दकोडे-१९३



**आडवे शब्द**
१. फायदा-तोटा ५. व्यावयाम ८. युद्ध ११. रस्ता, मार्ग १२. रूक्ष, कोरडे १३. कारण नसताना १४. कारस्थान १६. नीच, दुष्ट १८. कपोल २१. रवाळ, कणी असलेले २३. शरीर २५. सारखा २६. पराभव, ऱ्हास २७. फुरसत २९अ. सोलापूरचा प्रसिद्ध चटकदार पदार्थ ३०. एक चतुर्थांश ३१. गणपतीचे एक नाव ३३. पोवळे ३४. रसपूर्ण ३६. घाण ३७. नरसंहार ३८. रजतपटावरील अजरामर सौंदर्यसम्राज्ञी ४०. कणीदार ४२. उत्सव ४३. रूंद (बांधा) ४५. पांढराशुभ्र लुसलुशीत प्राणी ४७. डावा ४८. आघाताचे आयुध ४९. भारताचे पहिले पंतप्रधान ५३. एकरुप ५५. जरच्या मागेमागे येणारा अटीचा शब्द ५६. नटवा, सजावट करा ५७. बंदी, मज्जाव ५८. एक श्वासरोग ६०. नोकरी नसलेला निरूपयोगी? ६२. टक, दृष्टी ६५. कहाणी ६६. कळपातील प्रमुख हत्ती ६७. जास्वंद ६९. लोणी ७१. सीतापती ७२. दाट, ढग ७३. आचारी ७६. शूर पुरुष ७९. शिकार ८०. खोदकाम ८१. गवताचे रुंद पान ८२. एकाक्षरी प्रश्न ८३. मला ८४. प्रत्येक दिवशी ८५. मीठ, लवण ८६. चप्पल

**उभे शब्द**
१. नूतन २. मोठा दरवाजा ३. अचानक झालेला बदल ४. श्रेष्ठ पुरुष ५. लाकूड कापण्याचे हत्यार ६. मैत्रीण ७. रत्न ८. हेतू धरून केलेले कार्य ९. करपलेला, जळलेला भाग १०. तोफगाडी १३. नीच, दुष्ट १५. धरणे १७. गुजराथी नृत्यप्रकार १९. चटकन, त्वरित २०. गावाची हद्द २२. सेवक २४.'- - उतरू आलं, अंग झिम्माड झालं.' २६. पवित्र २८. घालविणे, गाळणे, सोडणे २९. फुरसत ३०. बासरी ३२. नगर, मोठे गाव ३३. अत्यंत हुशार, विद्वान ३५. नमस्काराचा एक शब्द ३६. उंटाच्या पाठीवरील उंचवटा ३८. शंभर किलो ३९. खाज ४१. दावा लावणारा, वैरी ४२. कमळ, मुलीचे एक नाव ४३. --- सामने, समोरासमोर ४४. गायीचे बछडे ४५. उद्देशावाचून ४६. उंट हाकणारा ४७. एक द्विदल धान्य ४८. येरझारा, जाणे-येणे ५०. निष्णांत ५१. दिवस ५२. विरोध, प्रतिबंध ५३. सारखा ५४. अंगरखा ५९. घरातील मधली खोली ६१. फणसाच्या एक प्रकार ६३. लोकांच्या मनातील विचार ६४. आवाज, गोगाट ६८. कर्ण ७०. पाणी ७३. घशाला त्रास देणारा अळू ७४. शर्करा ७५. मागाहून, मग ७७. दारूचा एक प्रकार ७८. विद्युत ७९. शृंगार, कोल्हापुरी दागिना ८१. कालवा, लग्न

## शब्दकोडे १९२ चे उत्तर

**आडवे उत्तर**
१.विलासराव देशमुख ८.चमत्कार ११.तगर १२.नयन १३.राख १४.रयत १६.शवासन १७.वनचर १९.परकर २१.कलाकार २२.हारा २३.पार्थसारथी २४.समर २७.वामनावतार ३०.कलागत ३२.वारस ३५.हाट ३६.रणगाडा ३८.रविवासर ४०.परवानगी ४३.रोखठोक ४५.वातड ४६.अवजड ४८.काजवा ४९.सुर ५०.बारदान ५२.थोर ५३.तडीपार ५४.हेरंब ५५.रासगरबा ५८.मलामाल ६०.मगर ६३.नारायण नारायण ६७.जरब ६९.पाप ७०.खर ७१.दानी ७२.रयतवारी ७४.सणवार ७५.अस्वीकार ७६.बोका

**उभे उत्तर**
१.विसर २.सतत ३.राग ४.वडा ५.शनिवार ६.खनन ७.कानवला ८.चराचर ९.मखर १०.रडराऊत १५.यथार्थ १६.शक १८.नकार १९.परवा २०.रथीमहारथी २१.कर २३.पारावार २४.सतार २५.मरण २६.चेला २८.नाट २९.खडा ३०.कसरत ३१.गहन ३३.रवि ३४.सवालजबाब ३७.गायक ३९.सरोज ४०.पवार ४१.वाडवडील ४२.गीतकार ४४.खवा ४६.अवहेलना ४७.डर ४८.कानस ४९.सुरमा ५१.दारा ५३.तमाशा ५६.रमण ५७.बाग ५९.कणखर ६१.रजनी ६२.विपरीत ६४.रावण ६५.नार ६६.यशस्वी ६८.बरका ६९.पावा ७१.दार ७३.तर्क

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

## न्यूज कॉलम

### शहराला स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकांची

**नाशिक ।** शहराला स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी प्रत्येक नागरीकाची असून शहरासोबतच देशही स्वच्छ ठेवणे सहज शक्य असल्याने प्रत्येकाने या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन क्वालिटी कौंसील ऑफ इंडीयाचे समन्वयक जितूभाई ठक्कर यांनी केले. नाशिकला देशातील पहिली क्वॉलिटी सिटी बनविण्याच्या दृष्टीने क्वॉलिटी कौन्सिल ऑफ इंडियाच्या सहभागाने हाती घेण्यात आलेल्या क्वॉलिटी सिटी नाशिक या अभियानातील तीन प्रमुख उद्दिष्टांपैकी स्वच्छता हे एक आहे. या पंधरवड्यानिमित्त क्वॉलिटी सिटी नाशिक अभियाना अंतर्गत स्वच्छतेसंदर्भात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

# सामाजिक सलोखा टिकविण्यासाठी महात्मा गांधी यांचे विचार महत्त्वाचे- रानडे

**नाशिक । प्रतिनिधी**

भारतात भांडवलशाहीला मानवी मूल्य जोपासण्यासाठी आग्रह करणारे गांधीजी सामाजिक व आर्थिक विषमता व धर्मांध शक्ति विरुद्ध संघर्ष त्यांनी शेवटपर्यंत सुरू ठेवले होते. 'मजबूती का नाम और संघर्ष का नाम महात्मा गांधी' असेच म्हणावे लागेल. आज पुनः जागतीक शांतता व देशातील सामाजिक सलोखा टिकविण्यासाठी महात्मा गांधी यांचे विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत. मना मनातील द्वेष भावना निर्मूलन म्हणजे एक प्रकारे वेगळी स्वच्छता मोहीम राबविणे गरजेचे असल्याचे मत मुकुंद रानडे यांनी व्यक्त केले.

काल दि. २ आक्टोबर रोजी हुतात्मा स्मारकात सकाळी १० महात्मा गांधी जयंती निमित्त मुकुंद रानडे यांचे व्याख्यान संपन्न झाले सुरुवातीला स्वातंत्र्य सैनिक समितीचे अध्यक्ष विजय राऊत, ज्येष्ठ गांधीवादी नेते गं.पा माने व माजी उपमहापौर अँड. मनीष बस्ते, डॉ मिलिंद वाघ, श्रीराम कातकाडे, मनियार, मोरे, भाऊसाहेब पवार, विश्राम धनवटे, निस्सार पटेल, नीलोफर शेख आदींच्या उपस्थितीत महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



स्वातंत्र्य सैनिक समितीचे अध्यक्ष विजय राऊत यांनी य प्रास्ताविक केले व ज्येष्ठ नेते गं पा माने यांनी गांधीजींचे विचार आचरणात आणणे गरजेचे तरुण पिढीला शिक्षणाबरोबर संस्कार करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. अँड मनीष बस्ते यांनी संयोजकांनी या पुढेही अशाच प्रकारे स्तुत्य उपक्रम राबविण्यात यावे असे नमूद केले.

यावेळी स्वातंत्र्य सैनिक समिती व ज्येष्ठ नागरिक वतीने प्रभाकर क्षीरसागर, अशोक राबडे, लीलाधर बेंद्रे, धनंजय चतुर, वसंतराव जाधव, तुकाराम बंदावणे, भाऊसाहेब सोनवणे, राजीव पाटील, छात्र भारतीचे युवराज साळवे, सचिन दप्तरे, राजकुमार सूर्यवंशी, सौरभ साळवे, प्रेरणा तवार, स्वरूप पिसे व हेमंत शिंदे, आण्णा घुगे, गणेश खैरनार व अभिजीत राऊत, किशोर भास्कर,गिरीश बच्छाव, नंदकुमार येवलेकर, मंगला माळी, मंगला जाधव, नंदकुमार येवलेकर याच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. श्रीराम कातकाडे यांनी आभार प्रदर्शन केले. भाऊसाहेब पवार यांनी सूत्रसंचालन केले.



# आम आदमी पार्टीतर्फे 'स्वच्छ्ता ही सेवा' उपक्रम

**नाशिक । प्रतिनिधी**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून २ ऑक्टोबर हा दिवस 'स्वच्छ भारत दिवस' म्हणून साजरा केला जातो. यावर्षी 'स्वच्छ भारत दिवस २०२३' च्या निमित्ताने आम आदमी पार्टी नाशिकच्या वतीने 'स्वच्छता हीच सेवा' हा उपक्रम शहरांतील निमाणी सिटी बस स्थानक येथे राबविण्यात आला.

'एक तास' स्वच्छतेसाठी देवून श्रमदानातून आप च्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या जीवनात स्वच्छता अनन्यसाधारण आहे याचे महत्त्व जनतेला समजावून सांगितले. महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्त स्वच्छ्ता अभियानास प्रारंभ करण्यात आला. यावेळी राज्य मीडिया प्रमूख चंदन पवार, देवळाली विधानसभा अध्यक्ष गिरीश उगले पाटील, पुर्व विधानसभा अध्यक्ष योगेश कापसे आणि पदाधिकारी स्वप्निल घिया, अमर गांगुर्डे, प्रदीप लोखंडे, दीपक सरोदे, चंद्रशेखर महानुभव, मेघराज भोसले, कलविंदर गरेवाल, अमित यादव आदी उपस्थित होते.

# एक कदम स्वच्छता की ओर या अभियानांतर्गत लासलगाव येथे स्वच्छ्ता मोहीम



**लासलगाव । वार्ताहर**

'स्वच्छ भारत, एक कदम स्वच्छता की ओर' या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अनोख्या उपक्रमा निमित्त भाजपा जिल्हा उत्तर विभाग च्या सरचिटणीस सुवर्णा जगताप यांच्या आयोजनातून तसेच भाजपाचे ज्येष्ठ नेते राजेंद्र चाफेकर, दत्तूलाल शर्मा याच्या मार्गदर्शनाखाली व परिसरातील नागरिकांच्या सहकार्याने श्री महावीर शाळा, संभाजी चौक ते आर.जे.मॉल मुख्य रस्ता या परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या भागातील रस्त्यांवर अनेक ठिकाणी जागोजागी खड्डे पडलेले होते त्याचप्रमाणे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात कचरा साचलेला होता.स्वच्छता अभियाना अंतर्गत सुवर्णा जगताप यांनी स्वतः लक्ष घालून जेसीबी द्वारे मुरूम पसरवून पूर्ण रस्त्याची दुरुस्ती करून घेतली. या सफाई अभियानात लासलगाव डॉक्टर्स असोसिएशनच्या अध्यक्षा संगीता सुरसे, जिल्हा सदस्या रूपा केदारे, उषा कुमावत, जैन प्रकोष्ठ अध्यक्ष मनीष चोपडा, निलेश लचके, सुनील सानप, अभिजीत लचके, कैलास जैन, दत्तात्रय माळी, मनोहर खिलवानी, लक्ष्मण खलसे, भोला पवार, सोनू आब्बड, सचिन कासार, जाधव सर, योगेश गलांडे, श्रीमती सुर्वे, श्रीमती सपकाळे तसेच परिसरातील नागरिक मोठ्या उत्साहाने हजर होते.

### महानगरपालिकेकडून गणेश मुर्तींचे संकलन

**नाशिक ।** नाशिक महानगरपालिके तर्फे पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी नागरीकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग रहावा याकरीता विविध उपक्रम राबविण्यात आले. नागरीकांनी त्याला प्रतिसाद देत उद्देश सफल केल्याचा निर्वाळा मनपा प्रशासनाद्वारे करण्यात आला. पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने तसेच नदीपात्रांचे जल प्रदुषण रोखण्यासाठी श्री मुर्ती दान करणे व निर्माल्य संकलित करण्यासाठी नाशिक महानगरपालिकेने केलेल्या आवाहनाला नागरीकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला असून, गणेशोत्सवाच्या दहाव्या दिवसाच्या श्री मुर्तीच्या विसर्जनाच्या अनुषंगाने नागरीकांनी गणेश मुर्ती दान करून व निर्माल्य कलशात जमा करून महानगरपालिकेस मोलाचे सहकार्य केल्याचे चित्र होते.

# मानस व्यसनमुक्ती केंद्रातर्फे व्यसनमुक्ती सप्ताह

### विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

**नाशिक । प्रतिनिधी**

अनुसया शिक्षण प्रसारक मंडळ नाशिक संचलित मानस व्यसनमुक्ती केंद्र, रोटरी क्लब ऑफ नाशिक मिड टाऊन, स्वामीनारायण नर्सिंग संस्था पंचवटी नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने २ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबर यादरम्यान व्यसनमुक्ती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती प्रकल्प समन्वयक डॉ.चंद्रशेखर नामपुरकर यांनी दिली.

सप्ताहनिमित्त आयोजित केलेल्या व्यसनमुक्ती संदेश यात्रेचे उद्घाटन रोटरी क्लब ऑफ नाशिक मिडटाऊनचे अध्यक्ष मनोज काबरा यांनी हिरवी झेंडी दाखवून केले. तसेच




सर्वप्रथम महात्मा गांधींच्या प्रतिमेस हार व पुष्पगुच्छ अर्पण करण्यात आले. रोटरी क्लब ऑफ मिडटाऊनतर्फे व्यसनमुक्ती विषयक प्रदर्शन, स्लाईड शो, व्याख्यानाचे आयोजन नाशिक शहरात महाविद्यालयीन युवक, औद्योगिक कामगार, माथाडी कामगार, एसटी कंडक्टर्स-ड्रायव्हरसाठी आयोजित केले असल्याची माहिती मनोज काबरा यांनी उद्घाटन प्रसंगी दिली.

कार्यक्रमास रोटरी क्लब ऑफ नाशिकचे सदस्य माजी अध्यक्ष देवनाथ पाटील, अवतारसिंग फनफेअर, सुभाष पगारे, माजी सचिव ड.अजय जाधव, मानसोपचार तज्ञ डॉ. अमोल पुरी, स्वामीनारायण नर्सिंग संस्थेच्या प्राचार्य शोभा चाट, नर्सिंग महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी उपस्थित होत्या. याप्रसंगी गेल्या अनेक वर्षापासून व्यसनमुक्त असलेल्या व्यक्तींचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.





# दातार म्हणजे समाजाला भरभरून देणारे

### कुलसंमेलनात उमटला सार्थ अभिमान

**नाशिक । प्रतिनिधी**

दातार कुळातील अनेक व्यक्ती देशभरात तसेच जगभरात पोहोचलेल्या आहेत. दातार म्हणजे समाजाला भरभरून देणारे. आपले नाव सार्थक करून ते समाजापुढे आदर्श निर्माण करतात. ही वृत्ती सर्वांनी अनुसरावी अशीच आहे असे प्रतिपादन निवृत्त कमोडोर हर्षद दातार यांनी केले. अखिल भारतीय दातार कुलसंमेलनाच्या उदघाट्नप्रसंगी ते बोलत होते.

सर्व दातार कुटुंबियांचे चौथे कुलसंमेलन नाशिकमध्ये आयोजित करण्यात आले. रविवारी ,दि.१ ऑक्टोबर रोजी गंगापूररोडवरील प्रसाद मंगल कार्यालय येथे हे संमेलन झाले. कमोडोर हर्षद दातार यांच्या हस्ते उदघाट्न करण्यात आले. कुलसंमेलन अध्यक्ष मुकुंद कुलकर्णी- दातार उपस्थित होते. दातार कुळात आगरकर, आघारकर, कुलकर्णी, वर्तक, फडणीस, सबनीस, दप्तरदार, चौकर यांचाही समावेश असल्याने त्यांचाही सहभाग होता. माहेरवाशिणींसह अनेकांनी उपस्थिती नोंदवली. प्रमुख पाहुणे म्हणून भालचंद्र तथा बाबासाहेब दातार उपस्थित होते. यावेळी विनायक रानडे, ड.सायली गोखले, आधाराश्रम या सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष विजय दातार, पदाधिकारी प्रभाकर केळकर, कल्याणी दातार, सुनीता परांजपे यांची उपस्थिती होती. प्राची आघारकर यांनी सर्व मुलाखती घेतल्या.

वंशावळीची माहिती मंदार दातार यांनी दिली तर चित्तपावन ब्राह्मण संघाची माहिती नितीन सहस्त्रबुद्धे यांनी दिली. संमेलन यशस्वितेसाठी अभिषेक दातार, सलील दातार, श्रीराम दातार आदींनी परिश्रम घेतले. दुपारच्या सत्रात जिगीषा ग्रुपच्या नेहा देशपांडे व सहकाऱ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. अभिनेत्री मधुरा आघारकर - टापरे यांची मुलाखत रंगली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेधा दातार यांनी केले. संगीता दातार यांनी आभार मानले.

### घराबाहेर उभ्या असलेल्या स्कॉर्पिओची चोरी

**नाशिक ।** खुटवड नगर येथे घराच्या समोरून स्कॉर्पिओची चोरी करण्यात आली. विशेष म्हणजे पोलीस चौकीच्या मागे ५० मीटर अंतरावर खुटवड नगर पोलीस चौकीच्या मागच्या बाजूला ५० मीटर अंतरावर विलास पाटील (६३) यांचा आदेश बंगला आहे. त्यांनी त्यांची स्कॉर्पिओ घराबाहेर लावली असताना (दि. २७ ) पहाटे ३.४५ ते ४.१५ च्या दरम्यान चारचाकी कार मध्ये आलेल्या तिघांनी स्कॉर्पिओ चोरून नेली. यावेळी घटनास्थळी माजी नगरसेवक तानाजी जायभावे व अलका आहिरे यांनी भेट देत पोलिसांच्या निष्क्रियतेबद्दल संताप व्यक्त केला. खुटवड नगर येथे घराच्या समोरून स्कॉर्पिओची चोरी करण्यात आली.

# मानव उत्थान सेवा समितीतर्फे स्वच्छता अभियान



**नाशिक । प्रतिनिधी**

सदगुरूदेव श्री सतपालजी महाराज प्रणीत मानव उत्थान सेवा समितीच्या वतीने रविवारी उंटवाडीजवळील कालिका पार्क येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. मानवधर्म प्रेमी, मानव सेवा दल आणि युवामंच्या स्वयंसेवकांनी त्यामध्ये उत्सफुर्तपणे सहभाग नोंदवित परिसराची साफ सफाई केली.

मानव उत्थान सेवा समितीच्या तपोवनातील सर्व धर्म मंदीर, सातपूर गावातील हंस ध्यान मंदीर आणि नाशिक - पुणे रोडवरील श्री हंस कल्याण धाम आश्रमाच्या वतीने रविवारी सिडको परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. महापालिकेच्या सहकार्याने झालेल्या या अभियानाचा शुभारंभ श्री हंस कल्याण धाम आश्रमाच्या प्रबंधक साध्वी हिराजी, साध्वी पंकजाजी, साध्वी मिथिलेशजी, माजी नगरसेवक सुधाकर बडगुजर, माजी नगरसेविका भाग्यश्री ढोमसे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. कालिका पार्क येथील पाटीलनगर मैदानासमोरील परिसर, सरस्वती विद्यालय, पाटील हॉस्पिटलजवळील परिसर यावेळी स्वच्छ करण्यात आला. यामध्ये मानव धर्म प्रेमी, मानव सेवा दल आणि युवादलाचे स्वयंसेवक सहभागी झाले. अल्पोपहाराने या अभियानाचा समारोप झाला.

# भास्करराव बोरस्ते यांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त वैकुंठरथाचे लोकार्पण

**नाशिक । प्रतिनिधी**

समाजकारण, राजकारण, बँकिंग, शैक्षणिक क्षेत्रातील ज्येष्ठ नेते के. भास्करराव लक्ष्मणराव बोरस्ते यांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त भास्करराव लक्ष्मणराव बोरस्ते यांचे ज्येष्ठ पुत्र व शिवसेना जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांनी आपल्या वडिलांच्या नावाने वैकुंठरथ पालकमंत्री दादाजी भुसे यांच्या प्रमुख उपस्थितीत नाशिक महापालिकेला सुपूर्त केला.




याप्रसंगी मनपा आयुक्त अशोक करंजकर, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. तानाजी चव्हाण, सहाय्यक वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत शेटे, अजय वाघ कार्यशाळा व्यवस्थापन अधिकारी, अजय बोरस्ते यांचे लहान बंधू अमित बोरस्ते, आदित्य बोरस्ते, संपर्क प्रमुख सुनील पाटील, सहसंपर्क प्रमुख चंद्रकांत लवटे, महिला आघाडी सहसंपर्क प्रमुख सुवर्णा मटाले, युवासेना विस्तराक योगेश बेलादार, लोकसभा जिल्हा संघटक योगेश म्हस्के, जिल्हा संघटक योगेश चव्हाणके, उप जिल्हाप्रमुख प्रमोद लासूरे, शशिकांत कोठुळे, महेश जोशी, अमोल सूर्यवंशी, नगरसेवक आर. डी. धोंगडे, चंद्रकांत खाडे, विधानसभा प्रमुख रोशन शिंदे, उपमहानगर प्रमुख आनंद फरताळे, उमेश चव्हाण, अमोल जोशी, मनीष खेले, युवासेना जिल्हाप्रमुख रुपेश पालकर, किरण फडोळ, शुभम पाटील, शरद देवरे, नितीन कासुरे, सीमा सिंघानिया, सरला चव्हाण, सुषम शिरसाठ, भिवानंद काळे, अभय महादास, शिवा जोशी, शरदचंद्र नामपूरकर, संजय घोडके, हर्षल पाटील, समीर देवघरे आदी उपस्थित होते. प्रथम पुण्यतिथीनिमित्त भास्करराव लक्ष्मणराव बोरस्ते यांचे ज्येष्ठ पुत्र व शिवसेना जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांनी आपल्या वडिलांच्या नावाने वैकुंठरथ पालकमंत्री दादाजी भुसे यांच्या प्रमुख उपस्थितीत नाशिक महापालिकेला सुपूर्त केला.

# नाशिक-पेठ महामार्गावर रास्ता रोको आंदोलन

**नाशिक । वार्ताहर**

येथील नाशिक-पेठ धरमपूर या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ८४८ वरील राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणातील दंडेलशाहीच्या विरोधात रास्त मागण्या दिर्घकाळापासून प्रलंबित ठेवल्याने उद्भवलेल्या असंतोषाने अदिवासी कृती समितीच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले आहे.

तर तहसिलदार अनिल पुरे व पोलीस निरीक्षक विकास देवरे घटनास्थळी दाखल झाले असून रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वाहने अडकून पडली आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, कोटंबी घाट आणि सावळघाटातील सतत अपघातास कारणीभूत ठरणारी वळणे, रस्ता दुरुस्ती तसेच सक्तीच्या टोल वसुलीच्या विरोधात पक्षभेद विसरून आंदोलनात सामील झाले आहेत. अदिवासी कृती समितीचे यशवंत गावंडे यांच्या नेतृत्वाखाली हा रास्ता रोको करण्यात आला. दरम्यान, आंदोलनात भास्कर गावीत, भिकाजी चौधरी, रामदास वाघेरे, सुरेश खंबाईत यांच्यासह आदी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. तर तहसिलदार अनिल पुरे व पोलीस निरीक्षक विकास देवरे घटनास्थळी दाखल झाले असून रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वाहने अडकून पडली आहेत.

# खा. हेमंत गोडसे यांच्याकडून इलेक्ट्रिकल टेस्टिंग लॅबची पाहणी

**उदघाटनासाठी केंद्रीय ऊर्जामंत्री, मुख्यमंत्र्यांना देणार निमंत्रण**

**नाशिक । प्रतिनिधी**

इलेक्ट्रिकल क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचे असलेली शिलापूर शिवारात उभारण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील केंद्रीय विद्युत अनुसंधान संस्थांच्या टेस्टिंग लॅबचे काम पूर्णत्वाकडे आहे. या लॅबच्या कामाची पाहणी खा.हेमंत गोडसे यांनी केली असून कामाच्या प्रगती संदर्भात त्यांनी समाधान व्यक्त केले आहे. येत्या दोन महिन्यात लॅबचा शुभारंभ होणार असून या कार्यक्रमासाठी केंद्रीय ऊर्जामंत्री आर.के.सिंग, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आदी मंत्र्याना निमंत्रित केले जाणार असल्याची माहिती खा. गोडसे यांनी दिली आहे. नव्याने उभारण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या लॅबमध्ये महाराष्ट्र, गुजरात, छत्तीसगड आदी देशातील राज्यांमधून तसेच नेपाळ, बांगलादेश या परदेशातूनही तपासण्यासाठी इलेक्ट्रिक उपकरणे आणि उत्पादने येणार आहेत. या प्रकल्पामुळे नाशिकची वाटचाल इलेक्ट्रिकल हबच्या दिशेने होणार आहे.



खा.हेमंत गोडसे यांच्या सततच्या प्रयत्नांमुळे शिलापूर येथील प्रस्तावित इलेक्ट्रिकल टेस्टिंग लॅबला सात वर्षापूर्वी केंद्राकडून मान्यता मिळालेली आहे. सदर प्रकल्प शंभर एकर जागेत उभारण्यात आलेला आहे. राज्यातील पहिली तर देशातील तिसरा क्रमांकाची ही इलेक्ट्रीकल लॅब असणार आहे. या प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम तीन वर्षांपूर्वी सुरू झाले होते. दरम्यानच्या काळात करोनामुळे प्रकल्पाचे काम मंदावले होते. गेल्या दीड वर्षांपासून प्रकल्पाचे काम वेगाने सुरू आहे. आता प्रकल्पाचे काम पूर्णत्वाच्या दिशेने आहे. लवकरच प्रकल्पाचे उद्धाटन होणार असल्याने खा. गोडसे यांनी आज या प्रकल्पाची पाहणी केली.

प्रकल्पाचे सीनियर प्रशासकीय अधिकारी प्रवीण कुमार, इंजिनियर ऑफिसर कळंबे, राम बाबू, के.एस.वर्मा या अधिकाऱ्यांनी पाहणी दरम्यान खा. गोडसे यांना प्रकल्पाची सविस्तर माहिती दिली. प्रकल्पासाठी एकलहरे येथून दोनशे वीस केबीचा पॉवर सप्लाय घेण्यात आला आहे. या इलेक्ट्रिक तपासणी प्रयोगशाळेत इलेक्ट्रिकल उपकरणे तसेच उत्पादनांचा पॉवर ट्रान्सफॉर्मर, करंट ट्रांसफार्मर, पोटेन्शियल ट्रान्सफॉर्मर, लाइटिंग अरेस्टर, ट्रान्सफॉर्मर ऑइल, विविध कंपन्यांचे मिटरची गुणवत्ता तपासण्या करण्यात येणार आहेत. यापूर्वी इलेक्ट्रिकल उत्पादकांना आपल्या उत्पादनाचा दर्जा तपासणीसाठी बेंगलोर, भोपाळ येथे जावे लागत असल्याने वेळ आणि आर्थिक खर्च मोठ्या प्रमाणावर होत असे. या प्रकल्पामुळे महाराष्ट्र, गुजरात, छत्तीसगड आदी राज्यांमधील इलेक्ट्रिक उत्पादकांना मोठा दिलासा मिळणार आहे. इलेक्ट्रिक टेस्टिंग लॅब प्रकल्पातील प्रयोगशाळेचे काम पूर्णत्वाकडे असून सर्व काम ऑनलाईन होणार आहे. प्रयोगशाळेला बुलेटप्रूफ ग्लास बसविण्यात आलेली असल्याची माहिती प्रकल्पाचे प्रशासकीय अधिकारी प्रवीण कुमार यांनी यावेळी खा.गोडसे यांना दिली. यावेळी शिवसेनेचे सह संपर्कप्रमुख गणेश कदम, जिल्हाप्रमुख अनिल ढिकले, शिलापुरचे माजी सरपंच रमेश कहांडळ, सरपंच पवन कहांडळ, सय्यद पिंपरीचे सरपंच भाऊसाहेब ढिकले, विंचूर गवळीचे सरपंच विजय रिकामे, शिलापूर सोसायटीचे चेअरमन गणेश कहांडळ, गणपत कहांडळ, रमेश कहांडळ आदी उपस्थित होते.

## न्यूज कॉलम

### अनोळखी व्यक्तीचा दोंडाईचात मृत्यू

**धुळे ।** दोंडाईचा (ता. शिंदखेडा) शहरात चैनी रोडवर आढळलेल्या अनोळखी व्यक्तीचा मृत्यू झाला. चैनी रोडवर एक अनोळखी व्यक्ती (वय अंदाजे ५०) बेशुद्धावस्थेत आढळली. तिला अभय गवते, शरद लेंडे यांनी नगर परिषदेच्या वाहनातून दोंडाईचा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तेथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. याबाबत दोंडाईचा पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली.

### मयुरी भामरे यांना ज्ञानदीप आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार प्रदान

**शिरपूर ।** शहरातील एच. आर. पटेल माध्यमिक कन्या विद्यालयातील क्रीडा शिक्षिका व राष्ट्रीय कॅरम खेळाडू मयुरी भामरे यांना ज्ञानदीप सेवा प्रतिष्ठान, कुरखळी ता. शिरपूर च्या वतीने ज्ञानदीप आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. कर्मवीर दालन येथे २२ सप्टेंबर २०२३ रोजी समारंभात हा पुरस्कार माजी जि.प.अध्यक्ष डॉ. तुषारभाऊ रंधे, ज्येष्ठ साहित्यिक एम.के.भामरे, पत्रकार प्रशांत परदेशी, पत्रकार दीपक बोरसे या मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार सोहळा स्व. दिपक मोरे, स्व. गिरीश मोरे व स्व. हिरामण कुंभार या शिक्षकांच्या स्मृती निमित्त ज्ञानदीप सेवा प्रतिष्ठान ने आयोजित केला होता.

# धुळे जिल्हा परिषदेत व्यसनमुक्ती सप्ताहाचे उद्घाटन




### अधिकारी कर्मचाऱ्यांनी घेतली व्यसनमुक्तीची शपथ!

**धुळे । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागामार्फत दिनांक २ ऑक्टोबर ते ८ ऑक्टोबर या दरम्यान व्यसनमुक्ती सप्ताह आयोजित करण्यात आला असून त्याचे उद्घाटन धुळे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष इंजि. अश्विनीताई पाटील यांचे प्रतिनिधी माजी कृषी सभापती प्राध्यापक श्री अरविंद जाधव आणि महिला बालकल्याण विभागाच्या सभापती श्रीमती संजीवनीताई सिसोदे यांच्या हस्ते आज करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित पदाधिकारी, अधिकारी, कर्मचाऱ्यांना व्यसनमुक्तीची शपथही देण्यात आली.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्ताने महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व सहाय्य विभाग आणि धुळे जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागामार्फत दिनांक २ ऑक्टोबर ते ८ ऑक्टोबर २०२३ यादरम्यान व्यसनमुक्ती जनजागृती सप्ताह राबविण्यात येणार आहे. या सप्ताहाचे उद्घाटन सोमवारी सकाळी धुळे जिल्हा परिषदेत मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष इंजि. अश्विनीताई पाटील यांचे प्रतिनिधी माजी कृषी सभापती प्राध्यापक श्री अरविंद जाधव, महिला व बालकल्याण विभागाच्या सभापती श्रीमती संजीवनीताई सिसोदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री बाळासाहेब बोटे, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री भाऊसाहेब अकलाडे यांच्यासह अधिकारी,कर्मचारी उपस्थित होते. यावेळी उपस्थित अधिकारी कर्मचाऱ्यांना व्यसनमुक्तीची शपथही देण्यात आली.

## एसव्हीकेएमतर्फे पर्यावरणपूरक गणेश विसर्जन

**शिरपूर ।** धुळे येथील एसव्हीकेएम अभियांत्रिकी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणेश विसर्जनाचा उपक्रम राबविला. गणेश विसर्जनाच्या दिवशी नागरिकांना विनंती करून श्रीमूर्ती स्वीकारून महापालिकेच्या निर्माल्य रथाकडे सोपवून महापालिकेच्या कुंडात विसर्जन केले. प्राचार्य डॉ. नीलेश साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मनोज सोनार, दीपकसिंह बघेल, डॉ. अंकुश मुधोळकर, प्रतीक देवरे, सचिन कांबळे, अमीर पिंजारी व राष्ट्रीय सेवा योजनाचे स्वयंसेवक यांनी हा उपक्रम पार पडला.

# माध्यमिक विद्यालय बोडकीखडीचे मुख्याध्यापक यांना आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

**साक्री । प्रतिनिधी**

तालुक्यातील माध्यमिक विद्यालय,बोडकीखडी ता.साक्री, जि. धुळे येथील मुख्याध्यापक युवराज ओंकार बोरसे यांना भारत सरकार व नैसर्गिक मानवाधिकार सुरक्षा परिषद फोरम आयोजित राज्यस्तरीय डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला.

धुळे येथे नैसर्गिक मानवधिकार सुरक्षा परिषद फोरम तर्फे राज्यस्तरीय डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. युवराज ओंकार बोरसे यांना शाळेत नाविन्यपूर्ण उपक्रम , पर्यावरण संवर्धन, मातीपासून गणपती बनविण्याच्या कार्यशाळा, विज्ञान प्रदर्शनातील उत्कृष्ट कामगिरी,विविध उपक्रमात कायम विद्यार्थ्यांना अनमोल असे मार्गदर्शन करणारे युवराज ओंकार बोरसे यांच्या या कार्याची दखल घेत धुळे येथील नैसर्गिक मानवधिकार सुरक्षा परिषद फोरम ने त्यांचा डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करून सन्मान केला आहे.



यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कर्नल गणपती निवासन, भाऊसाहेब शिवाजी अकलाडे, गोरख देवरे, प्रफुल सिताराम पाटील, ईश्वर पाटील यांच्या शुभहस्ते या पुरस्काराचे वितरण झाले. बोरसे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे साक्री तालुका विधायक समितीच्या मार्गदर्शिका सुनेत्रा सुभाष सोनवणे, संस्थेचे अध्यक्ष सुजन सोनवणे तसेच छत्रपती संभाजी मा.वि. चे मुख्याध्यापक जगदीश शिंदे व शिक्षक वृंद यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## साडीने गळफास घेत तरुणाची आत्महत्या

**धुळे ।** येथील वाडीभोकर येथे तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. मयूर प्रकाश वाघ (वय २२, रा. इंदिरानगर, वाडीभोकर, ता. धुळे) असे मृत तरुणाचे नाव आहे. तो दारूच्या नशेत घरी आला. त्या वेळी त्याने गळ्यावर व हातावर कात्री मारलेली दिसली. आईने त्याची समजूत घातली. नंतर आई मयूरला जेवण वाढण्यासाठी गेली. नंतर मयूर स्लॅबच्या लोखंडी हुकला साडीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत निदर्शनास आला. त्याला उपचारासाठी तातडीने हिरे रुग्णालयात दाखल केले मात्र, तेथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# महात्मा गांधी-लाल बहादूर शास्त्री यांना जयंतीनिमित्त ठिकठिकाणी अभिवादन





धुळे, महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना माजी आमदार राजवर्धन कदमबांडे समवेत मुन्ना शितोळे, चंद्रकांत महाजन तसेच महापौर प्रतिभा चौधरी आदी पदाधिकारी उपस्थित होते.



### राष्ट्रवादीने केले महात्मा गांधींना अभिवादन.

**धुळे ।** महात्मा गांधी जयंती निमित्त धुळे शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने महात्मा गांधीजींना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळेस राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष रणजीत राजे भोसले,रईस काजी, राजेंद्र सोलंकी, जयदीप बागल, अमित शेख, राजू चौधरी, भोला सेंदाणे, सागर चौगुले, वैभव पाटील, विशाल भामरे,मंगलदास वाघ, आकाश बैसाणे,जावेद बेग, मयूर शिंद, भटू पाटील, युसुफ शेख आदी उपस्थित होते.



### लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त धुळे शहरात अभिवादन

**धुळे ।** लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना काँग्रेस जिल्हाध्यक्ष श्याम सनेर, शहराध्यक्ष डॉ. अनिल भामरे, शिक्षक सेल प्रदेश कार्यकारी प्रमुख प्रा. विलासराव पाटील, मधुकर मरसाळे, राजेंद्र खैरनार, प्रकाश शर्मा, इलियास अन्सारी, रवी चौधरी, बानूताई शिरसाट, अर्चना पाटील, भटू महाले, दीपक पाटील, संजय सावंत आदी मान्यवर उपस्थित होते.

### चिमठाणे प्राथमिक आरोग्य केंद्रात महात्मा गांधी जयंती साजरी



**चिमठाणे ।** चिमठाणे येथे महात्मा गांधी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी आरोग्य विभागाचे समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. शितल वसंतराव सूर्यवंशी यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. या वेळी आरोग्य विभागाचे कर्मचारी राहुल परदेशी, दीपक माळी, दादाभाई पहाडी, रुग्ण वाहिका चालक भगवंत वाघ तसेंच गावातील प्रतिष्ठित नागरिक व तरुण उपस्थीत होते. सुरेंद्र गिरासे, महेंद्र गिरासे,संदीप जगताप, आबा अहिरे, विक्रांत गिरासे, कल्पेश बोरसे, मोनू पाटील, ऋषिकेश मराठे, अमोल गिरासे आदी उपस्थीत होते.

# कर्मयोगीनगरमध्ये अभूतपूर्व उत्साहात गणेश विसर्जन

### तीन हजार आठशे मूर्ती, दोन ट्रॅक्टर निर्माल्य संकलन

**नाशिक । प्रतिनिधी**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष, सत्कार्य फाउंडेशनने सुरू केलेल्या कृत्रिम तलावात गणेश विसर्जन व मूर्ती संकलन उपक्रमाला कर्मयोगीनगर येथे तिसर्या वर्षीही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. वाजत-गाजत, गुलाल उधळत येत हजारो रहिवाशांनी अभूतपूर्व उत्साहात गणेश विसर्जन केले. सुमारे तीन हजार आठशेहून अधिक मूर्ती आणि दोन ट्रॅक्टर निर्माल्य संकलीत करण्यात आले. पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह महापालिका अधिकारी, कर्मचारी रात्री उशीरापर्यंत येथे कार्यरत होते.



सत्कार्य फाउंडेशनचे अध्यक्ष बाबासाहेब गायकवाड (देशमुख), शिवसेना कार्यकर्त्या चारुशीला गायकवाड (देशमुख) यांच्या संकल्पनेतून सन २०२१ मध्ये कर्मयोगीनगर येथे छत्रपती राजे संभाजी महाराज व्यायामशाळेजवळ कृत्रिम तलावात गणेश विसर्जन व मूर्ती संकलन उपक्रम सुरू करण्यात आला. दुसर्या वर्षी सन २०२२ पासून महापालिकेने या ठिकाणच्या या उपक्रमाला अधिकृत मान्यता दिली व सुविधा उपलब्ध करून दिल्या. प्रतीवर्षीप्रमाणे गुरुवारी सकाळी साडेआठ वाजता विसर्जन कुंडाचे विधीवत पूजन करून विसर्जनाला सुरुवात करण्यात आली. रात्री दहा वाजेपर्यंत मोठ्या उत्साहात विसर्जन सुरू होते. रात्री साडेअकरा वाजता शेवटच्या गणेश मूर्तीचे विसर्जन करण्यात आले. माजी आमदार नितीन भोसले यांनी या उपक्रमाचे स्वागत करीत आपल्या घरच्या बाप्पाचे विसर्जन येथे केले. कर्मयोगीनगर, तिडकेनगर, गोविंदनगर, जुने सिडको, कालिका पार्क, उंटवाडी, मंगलमूर्तीनगर, जगतापनगर, बाजीरावनगर, सद्गुरुनगर, सदाशिवनगर, पाटीलनगर, बडदेनगर, पांगरे मळा, खोडे मळा, काशिकोनगर, बेळे कॉलनी, कृष्णबन कॉलनी, भुजबळ फार्म परिसर, हेडगेवारनगर, त्रिमूर्ती चौक आदी परिसरातील हजारो गणेशभक्तांनी येथे येवून मूर्ती दान केल्या. महापालिका नवीन नाशिक विभागीय अधिकारी मयुर पाटील, बांधकाम विभागाचे उपअभियंता हेमंत पठे, शाखा अभियंता जगदीश रत्नपारखी हे नियोजनावर लक्ष ठेवून होते. दिलीप हांडोरे, हिरामण दातीर, विनोद बिडवई, रंगनाथ गुंजाळ, राजेंद्र कुवर, शंकर घुले, संतोष गायकवाड, किशोर जगताप यांच्यासह कर्मचारी हजर होते. सत्कार्य फाउंडेशनचे अध्यक्ष बाबासाहेब गायकवाड शांततेत, उत्साहात विसर्जन करण्यास सहकार्य केल्याबद्दल शिवसेना, सत्कार्य फाउंडेशनने रहिवाशी व प्रशासकीय यंत्रणांचे आभार मानले आहे.

**घर विकणे आहे**

चार रुम, आरसीसी बांधकाम सर्व सोयींनीयुक्त असलेले घर विकणे आहे. पत्ता: अंबिका मित्र मंडळ, बडगुजर प्लॉट, पारोळा रोड, धुळे

: संपर्क :

Mo. 81779 29477

CMYK

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र





# स्वच्छता शपथ रॅलीने वेधले लक्ष : अधिकारी- लोकप्रतिनिधीसह ग्रामस्थांच्या हाती झाडू

## एक तारीख- एक तास स्वच्छतेसाठी जिल्ह्यात महाश्रमदान!


















धुळे ।
स्वच्छतेसाठी महाश्रमदान करण्यात आले. जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींसह अधिकारी, विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्तीने सक्रिय सहभाग नोंदविला. स्वच्छ भारत अभियन अंतर्गत जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अश्विनी पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारीशुभम गुप्ता, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक बाळासाहेब बोटे, पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबविण्यात असून कचरा मुक्त भारत अशी या वर्षाची संकल्पना आहे. वार्ड /ग्रामपंचायत अंतर्गत जास्त कचरा असलेले क्षेत्र , बसस्थानक, राष्ट्रीय/ राज्य महामार्गाच्या शेजारील जागा, जलस्रोत, पूला खालच्या जागा, बाजारपेठा, गल्ल्या, धार्मिक स्थळे,सार्वजनिक व खाजगी कार्यालयांचे परिसर,पर्यटन स्थळे, रहिवास क्षेत्र, आरोग्य संस्था ,आसपासचा परिसर, शाळा,महाविद्यालय, अंगणवाडी परिसर अशा महत्त्वाच्या ठिकाणी ही मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत सर्व स्वयंसेवी संस्था, लोकप्रतिनिधी,शाळा, महाविद्यालयीन मुले,मुली, एनएसएस, बचत गट महिला, स्वच्छाग्रही यासह समाजातील सर्व घटकांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

संकलन : दिपक वाघ

CMYK

दैनिक

# लक्ष महाराष्ट्र

मंगळवार, दि. ३ ऑक्टोबर २०२३





# सिंहस्थ कुंभमेळ्यापर्यंत प्लास्टिक मुक्त गोदावरीचा संकल्प

## अध्यात्मिक गुरु श्री.एम. यांचे आवाहन

































नाशिक । नाशिकमध्ये

गोदावरीचे प्रदूषण टाळण्याच्या दृष्टीने उत्तमरीत्या काम होत असून पुढे होऊ घातलेल्या २०२७ च्या सिंहस्थ कुंभमेळ्यापर्यंत प्लास्टिक मुक्त गोदावरीचा संकल्प आपण सर्वजण करून गोदावरी नदीला शुद्ध करू असे आवाहन अध्यात्मिक गुरु श्री.एम.यांनी केले. स्वच्छता अभियाना अंतर्गत गोदावरी प्रदूषण टाळण्याच्या दृष्टीने अविरल गोदावरी अभियान हाती घेण्यात आले आहे. त्याचा शुभारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत सकाळी गोदापूजन करून दादा महाराज जगताप, योगयोगेश्वर जय शंकर सेवाभावी संस्थाचे प्रमुखांच्या हस्ते गोदा पूजन करून अविरल गोदावरी कार्यक्रम शुभारंभ झाला. अध्यात्मिक गुरू श्री एम,मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.अशोक करंजकर, जिल्हाधिकारी जलज शर्मा, सिने अभिनेता चिन्मय उदगीरकर यांच्या हस्ते गोदामाईची महाआरती करण्यात आली. यावेळी कार्यक्रमात बोलताना अध्यात्मिक गुरु श्री एम यांनी सांगितले की, नाशिकमध्ये जे कार्य होत आहे ते कार्य उत्तमरीत्या होत असून अशाच पद्धतीने काम करून आगामी २०२७ च्या सिंहस्थ कुंभमेळ्यापर्यंत प्लास्टिक मुक्त करण्याची प्रतिज्ञा घेणे महत्त्वाचे असून सर्वांनी या कार्यात सहभाग नोंदवून प्लास्टिक मुक्त व प्रदूषण मुक्त गोदामाई करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी बोलताना जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी सांगितले की, नाशिकमध्ये स्वच्छता हे एक प्रमुख ध्येय असून त्यासाठी प्रशासकीय पातळीवर मोठ्या प्रमाणात काम केले जात आहे. त्याचबरोबर हरित नाशिक, स्वच्छ नाशिक करून आगामी होणारा सिंहस्थ कुंभमेळा हरित कुंभ म्हणून केला जाईल त्यामध्ये सर्वांचे सहकार्य व भूमिका महत्त्वाची असून त्यातून हरित कुंभ होईल असा विश्वास यावेळी जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमास मनपा अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, उपायुक्त डॉ. विजयकुमार मुंडे, घनकचरा व्यवस्थापन संचालक डॉ.आवेश पलोड, भाजपा प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडियाचे नाशिकचे पदाधिकारी जितूभाई ठक्कर, हेमंत राठी, नमामी गोदाचे राजेश पंडित, विभागीय स्वच्छता निरीक्षक संजय दराडे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.